Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VII ISSUE- I JANUARY 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# विदर्भाच्या शहरी व ग्रामीण भागातील महाविद्यालयात कबड्डी खेळाचे व्यवस्थापन एक तुलनात्मक अभ्यास

**प्रा. संदीप दामोधरराव मैंद**
भगवंतराव कला विज्ञान महाविद्यालय,
एटापल्ली, जिल्हा– गडचिरोली

**डॉ. संजयकुमार सिंह**
प्राचार्य
शरदराव पवार कला व वाणिज्य महाविद्यालय,
गडचांदूर, जिल्हा– चंद्रपूर

## प्रस्तावना

कबड्डी हा खेळ अगदी पुरातन काळापासून आपल्या देशात खेळला जातो. कबड्डी सारख्या उपेक्षित भारतीय खेळाला आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी अथक प्रयत्न करावे लागले. त्यातूनच जिल्हा संघटना व राज्य संघटना उदयास आल्या पुढे राष्ट्रीय कबड्डी संघटना उदयाला आली सन १९७५ मध्ये श्री. शरदराव पवार यांचे तरूण व तडफदार नेतृत्व कबड्डीला लाभले. त्यांनी कबड्डीसाठी चौफेर प्रगतीच्या वाटा शोधण्यास सुरूवात करून ऐतिहासीक प्रयत्न केले. त्यांनी एक सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या भुमिकेतूनच तेव्हा धडपड करून कबड्डीला आंतरराष्ट्रीय मिळवुन देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रेरणेने नेपाळ, भुतान, सिंगापुर, पाकिस्तान, थायलंड, जापान, आदि आशियाई देशामध्ये कबड्डीची दिंडी पोहचविली. परंतु, महाराष्ट्रातील तसेच भारतातील कबड्डी खेळाचा विकास अपेक्षेप्रमाणे झाला नाही.

खेळ आउटडोअर असो किंवा इनडोअर खेळ असो. हे सर्व खेळ मनोरंजन, स्वास्थवर्धन याबरोबरच व्यावसायिक स्वरूपातही खेळल्या जातो. विदर्भातील कबड्डी खेळाकडे एक दृष्टिक्षेप टाकल्यास असे निदर्शनास येते की, अजूनही या भागात संसाधनांचा व उत्कृष्ट मैदानांचा अभाव असल्याने उत्कृष्ट व चांगले खेळाडू तयार होत नाही, होत असले तरी त्यांची संख्या नगण्य आहे. महाविद्यालयाच्या वतीने खेळणारे अनेक विद्यार्थी खेळाडू ग्रामीण परिसरातील आलेले असल्याने ते प्रशिक्षीत नसतात. पण सरावाने व प्रशिक्षक प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाने ते उत्तम खेळाडू बनतात. अशा ग्रामीण भागातील महाविद्यलयीन खेळाडूंना कबड्डी या खेळाची शास्त्रशुद्ध माहिती देणे व त्यांच्या समस्यांचे निदान करणे. या सर्व बाबींचा अभ्यास या संशोधनात करण्यात आला आहे. क्रीडाक्षेत्राशी संबंधित विविध संशोधनातील निष्कर्ष कबड्डी या खेळाशी निगडीत खेळाडूंच्या समस्यांबद्दल भष्य करत असतात. याकरीता विदर्भातील शहरी व ग्रामीण भागातील कबड्डी खेळाडूंच्या महाविद्यालयात कबड्डी खेळाच्या व्यवस्थापन या घटकाचा तुलनात्मक अभ्यास शास्त्रीय व तंत्रशुद्ध पद्धतीने करून अहवाल स्वरूपात मांडणे हा या संशोधनाचा मुख्य उद्देश आहे.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी मुख्यत: प्रश्नावली, वर्तनात्मक आणि विश्लेषणात्मक सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला. संशोधनासाठी विदर्भाच्या शहरी व ग्रामीण भागातील महाविद्यालयात कबड्डी खेळाचे व्यवस्थापनाचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला.

## नमुना निवड

प्रस्तुत संशोधनाकरीता नागपूर व अमरावती विभागातील सर्व जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागात असलेल्या महाविद्यालयातील कबड्डी खेळाडूंचा समावेश करण्यात आला. अमरावती व नागपूर अशा विदर्भाच्या दोन्ही प्रशासकिय विभागातून ८८० कबड्डी खेळाडू निवडण्यात आले. ह्यांची निवड यादृच्छिक पद्धतीने करण्यात आली. यामध्ये अमरावती विभागातून ४४० व नागपूर विभागातून ४४० असे ८८० कबड्डी खेळाडू निवडण्यात आले.

## माहितीचे प्राथमिक स्त्रोत

कबड्डी खेळाडूंच्या महाविद्यालयातील कबड्डी खेळाचे व्यवस्थापनासंदर्भात माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावली तयार करण्यात आली. तसेच सर्वेक्षण माध्यमाने माहिती गोळा करण्यात आली. प्रश्नावलीची निर्मीती मार्गदर्शकाच्या निर्देशानुसार करयात आली आणि सोबत या

विषयाचे विशेषज्ञ व क्रिडाक्षेत्राशी निगडीत व्यक्तींचा सल्ला घेण्यात आला. प्रश्नावलीसाठी पुस्तके व साहित्याची मदत घेण्यात आली. निर्मीत प्रश्न तांत्रिक व सुव्यवस्थित पद्धतीने मांडले गेले. प्रश्नांची रूपरेषा सर्वसाधारण, सरळ व स्पष्ट ठेवण्यात आली.

**माहितीचे दुय्यम स्त्रोत**

विद्यापीठ, शारीरिक शिक्षण व विभाग कार्यालय, क्रीडा प्रमुख हयांची मुलाखत घेऊन माहिती मिळविण्यात आली.

**आकडयांच्या संग्रह व सांख्यिकीय विश्लेषण**

प्रश्नावली भरून आल्यानंतर निरनिराळया भागात (शहरी व ग्रामीण) विभागण्यात आली त्यानंतर सांख्यकीय पद्धतीने शेकडा प्रमाण काढून त्याआधारे तालिका तयार करण्यात आली. मालिकेवरून आलेख तयार करण्यात आले व आलेखावरून विवेचन तयार करण्यात आले. त्यानंतर सांख्यकीय विश्लेषण व तुलनात्मक विश्लेषण करण्यात आले.

**सांख्यकीय विश्लेषण**

**३.१महाविद्यालयाचे कबड्डी खेळाकरिता स्वतंत्र मैदान**

**सारणी क्रमांक १:**

कबड्डी खेळाकरिता महाविद्यालयात स्वतंत्र मैदानाची उपलब्धता याची माहिती दर्शविणारी सारणी

| प्रतिक्रीया | शहरी | | ग्रामीण | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| होय | १४१ | ३२.० | ३२२ | ७३.२ |
| नाही | २९९ | ६८.० | ११८ | २६.८ |
| एकूण | ४४० | १००.० | ४४० | १००.० |

**काई वर्ग मूल्य**:– १४९.३२२, **स्वातंत्र्यांश** – १, **तालिका मूल्य**:– ३.८४, P **मूल्य**:–<0.05

वरील सारणी क्रमांक १ मध्ये विदर्भातील शहरी व ग्रामीण भागातील महाविद्यालयात कबड्डी खेळाकरिता स्वतंत्र मैदान उपलब्ध असण्याबाबत खेळाडूंची प्रतिक्रिया दर्शविण्यात आली आहे.

- **शहरी भाग** : संशोधन क्षेत्रातील शहरी भागातील ३२.० टक्के खेळाडूंना महाविद्यालयात खेळाकरिता स्वतंत्र मैदान उपलब्ध आहे तर ६८.० टक्के खेळाडूंना महाविद्यालयात खेळाकरिता स्वतंत्र मैदान उपलब्ध नाही.
- **ग्रामीण भाग** : संशोधन क्षेत्रातील ग्रामीण भागातील ७३.२ टक्के खेळाडूंना महाविद्यालयात खेळाकरिता स्वतंत्र मैदान उपलब्ध आहे तर २६.८ टक्के खेळाडूंना महाविद्यालयात खेळाकरिता स्वतंत्र मैदानाची उपलब्धता नाही.

**३.२ महाविद्यालयामध्ये कबड्डी खेळाच्या सरावाची नियमितता**

**सारणी क्रमांक २:**

महाविद्यालयामध्ये कबड्डी खेळाच्या सरावाच्या नियमिततेबाबत माहिती दर्शविणारी सारणी

| प्रतिक्रीया | शहरी | | ग्रामीण | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| होय | १२८ | २९.१ | ९४ | २१.४ |
| नाही | ३१२ | ७०.९ | ३४६ | ७८.६ |
| एकूण | ४४० | १००.० | ४४० | १००.० |

**काई वर्ग मूल्य**:– ६.९६४, **स्वातंत्र्यांश** – १, **तालिका मूल्य**:–३.८४, P **मूल्य**:–<0.05

वरील सारणी क्रमांक २ मध्ये विदर्भातील शहरी व ग्रामीण भागातील महाविद्यालयामध्ये कबड्डी खेळाचा सराव दररोज करण्यात येत असण्याबाबत खेळाडूंची प्रतिक्रिया दर्शविण्यात आली आहे.

- **शहरी भाग** : संशोधन क्षेत्रातील शहरी भागातील २९.१ टक्के खेळाडूंना महाविद्यालयामध्ये खेळाचा सराव दररोज करण्यात येत असून ७०.९ टक्के खेळाडूंना महाविद्यालयामध्ये खेळाचा सराव दररोज करण्यात येत नसल्याचे आढळले.
- **ग्रामीण भाग** : संशोधन क्षेत्रातील ग्रामीण भागातील २१.४ टक्के खेळाडूंना महाविद्यालयामध्ये खेळाचा सराव दररोज करण्यात येत असून ७८.६ टक्के खेळाडूंना महाविद्यालयामध्ये खेळाचा सराव दररोज करण्यात येत नसल्याचे आढळले.

**३.३महाविद्यालयात कबड्डी खेळाचे वार्षिक वेळापत्रक बनविण्याबाबत**

**सारणी क्रमांक ३:**

महाविद्यालयातील कबड्डी खेळाच्या वार्षिक वेळापत्रक बनविण्याबाबत खेळाडूंची प्रतिक्रिया दर्शविणारी सारणी

| प्रतिक्रीया | शहरी | | ग्रामीण | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| होय | २८ | ६.४ | ३३ | ७.५ |
| नाही | ४१२ | ९३.६ | ४०७ | ९२.५ |
| एकूण | ४४० | १००.० | ४४० | १००.० |

**काई वर्ग मूल्य**:– ०.४४, **स्वातंत्र्यांश** – १,
**तालिका मूल्य**:– ३.८४, P **मूल्य**:–N.S.

वरील सारणी क्रमांक ३ मध्ये विदर्भातील शहरी व ग्रामीण भागातील महाविद्यालयात दरवर्षी कबड्डी खेळाचे वार्षिक वेळापत्रक बनविण्यात येत असण्याबाबत खेळाडूंची प्रतिक्रिया दर्शविण्यात आली आहे.

- **शहरी भाग** : संशोधन क्षेत्रातील शहरी भागातील ६.४ टक्के खेळाडूंच्या महाविद्यालयात दरवर्षी खेळाचे वार्षिक वेळापत्रक बनविण्यात येते तर ९३.६ टक्के खेळाडूंच्या महाविद्यालयात दरवर्षी खेळाचे वार्षिक वेळापत्रक बनविण्यात येत नाही.
- **ग्रामीण भाग** : संशोधन क्षेत्रातील ग्रामीण भागातील ७.५ टक्के खेळाडूंच्या महाविद्यालयात दरवर्षी खेळाचे वार्षिक वेळापत्रक बनविण्यात येते तर ९२.५ टक्के खेळाडूंच्या महाविद्यालयात दरवर्षी खेळाचे वार्षिक वेळापत्रक बनविण्यात येत नाही.

**३.४महाविद्यालयाचे व्यवस्थापन व कबड्डी खेळाचे नियोजन व आयोजन**

**सारणी क्रमांक ४:**

महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाची कबड्डी खेळाच्या नियोजन व आयोजनातील भूमिका दर्शविणारी सारणी

| प्रतिक्रीया | शहरी | | ग्रामीण | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| होय | १५३ | ३४.८ | २५८ | ५८.६ |
| नाही | २८७ | ६५.२ | १८२ | ४१.४ |
| एकूण | ४४० | १००.० | ४४० | १००.० |

**काई वर्ग मूल्य**:– ५०.३३२, **स्वातंत्र्यांश** – १,
**तालिका मूल्य**:– ३.८४, P **मूल्य**:–<0.05

वरील सारणी क्रमांक ४ मध्ये विदर्भातील शहरी व ग्रामीण भागातील महाविद्यालयाचे व्यवस्थापन कबड्डी खेळाच्या नियोजन व आयोजनात सर्व प्रकारची मदत करत असण्याबाबत खेळाडूंची प्रतिक्रिया दर्शविण्यात आली आहे.

- **शहरी भाग** : संशोधन क्षेत्रातील शहरी भागातील ३४.८ टक्के खेळाडूंच्या महाविद्यालयाचे व्यवस्थापन खेळाच्या नियोजन व आयोजनात सर्व प्रकारची मदत करते तर ६५.२ टक्के खेळाडूंचे महाविद्यालयाचे व्यवस्थापन खेळाच्या नियोजन व आयोजनात सर्व प्रकारची मदत करीत नाही.
- **ग्रामीण भाग** : संशोधन क्षेत्रातील ग्रामीण भागातील ५८.६ टक्के खेळाडूंच्या महाविद्यालयाचे व्यवस्थापन खेळाच्या नियोजन व आयोजनात सर्व प्रकारची मदत करते तर ४१.४ टक्के खेळाडूंचे महाविद्यालयाचे व्यवस्थापन खेळाच्या नियोजन व आयोजनात सर्व प्रकारची मदत करत नाही.

**३.५खेळाचा स्तर उंचविण्यासाठी महाविद्यालयाद्वारे करण्यात येणारे प्रयत्न**

**सारणी क्रमांक ५:**

कबड्डी खेळाचा स्तर उंचविण्यासाठी महाविद्यालयाद्वारे करण्यात येणाऱ्या प्रयत्नांबाबत माहिती दर्शविणारी सारणी

| प्रतिक्रीया | शहरी | | ग्रामीण | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| तज्ञ प्रशिक्षक | ३९० | ८८.६ | ३७५ | ८५.२ |
| अतिरिक्त सराव | ३४२ | ७७.७ | ३१८ | ७२.३ |
| आहार तज्ञाद्वारे मार्गदर्शन | ५९ | १३.४ | – | ०.० |

वरील सारणी क्रमांक ५ मध्ये विदर्भातील शहरी व ग्रामीण भागात कबड्डी खेळाचा स्तर उंचविण्यासाठी महाविद्यालयाद्वारे करण्यात येणाऱ्या प्रयत्नांबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे.

- **शहरी भाग** : संशोधन क्षेत्रातील शहरी भागातील ८८.६ टक्के खेळाडूंच्या महाविद्यालयाद्वारे खेळाचा स्तर उंचावण्यासाठी तज्ञ प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यात येते तर ७७.७ टक्के खेळाडूंच्या महाविद्यालयाद्वारे खेळाडूंकडून अतिरिक्त सराव करून घेण्यात येते. तसेच १३.४ टक्के खेळाडूंच्या महाविद्यालयाद्वारे खेळाडूंना आहारविषयक तज्ञाचे मार्गदर्शन प्रदान करण्यात येते.
- **ग्रामीण भाग** : संशोधन क्षेत्रातील ग्रामीण भागातील ८५.२ टक्के खेळाडूंच्या महाविद्यालयाद्वारे खेळाचा

स्तर उंचावण्यासाठी तज्ञ प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यात येते तर ७२.३ टक्के खेळाडूंच्या महाविद्यालयाद्वारे खेळाडूंकडून अतिरिक्त सराव करून घेण्यात येते.

**३.६कबड्डी खेळाकरीता प्रशिक्षण शिबीराचे आयोजन**

**सारणी क्रमांक ६:**

महाविद्यालयतर्फे खेळाडूंकरीता प्रशिक्षण शिबीराचे आयोजन याबाबत माहिती दर्शविणारी सारणी

| प्रतिक्रीया | शहरी | | ग्रामीण | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| होय | १६८ | ३८.२ | ८७ | १९.८ |
| नाही | २७२ | ६१.८ | ३५३ | ८०.२ |
| एकूण | ४४० | १००.० | ४४० | १००.० |

**काई वर्ग मूल्य:**— ३६.२२७, **स्वातंत्र्यांश** – १, **तालिका मूल्य:**— ३.८४, P **मूल्य:**—<0.05

वरील सारणी क्रमांक ६ मध्ये विदर्भातील शहरी व ग्रामीण भागातील खेळाडूंच्या महाविद्यालयतर्फे कबड्डी खेळाकरीता प्रशिक्षण शिबीराचे आयोजन होत असण्याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे.

- **शहरी भाग** : संशोधन क्षेत्रातील शहरी भागातील ३८.२ टक्के खेळाडूंच्या महाविद्यालयातर्फे खेळाकरीता प्रशिक्षण शिबीराचे आयोजन होते तर ६१.८ टक्के खेळाडूंच्या महाविद्यालयातर्फे खेळाकरीता प्रशिक्षण शिबीराचे आयोजन होत नाही.
- **ग्रामीण भाग** : संशोधन क्षेत्रातील ग्रामीण भागातील १९.८ टक्के खेळाडूंच्या महाविद्यालयातर्फे खेळाकरीता प्रशिक्षण शिबीराचे आयोजन होते तर ८०.२ टक्के खेळाडूंच्या महाविद्यालयातर्फे खेळाकरीता प्रशिक्षण शिबीराचे आयोजन होत नाही.

**४.०निष्कर्ष**

**४.१महाविद्यालयाचे कबड्डी खेळाकरिता स्वतंत्र मैदान असणे**

- अध्ययनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की विदर्भातील शहरी व ग्रामीण भागातील महाविद्यालयात कबड्डी खेळाकरिता स्वतंत्र मैदानाच्या उपलब्धतेमध्ये सार्थक फरक आहे. त्याचप्रमाणे शहरी भागातील बहुतांश कबड्डी खेळाडूंना महाविद्यालयात कबड्डी खेळाकरिता स्वतंत्र मैदान उपलब्ध नसून ग्रामीण भागातील महाविद्यालयात कबड्डी खेळाकरिता स्वतंत्र मैदान उपलब्ध आहेत.

**४.२महाविद्यालयामध्ये कबड्डी खेळाचा नियमित सराव**

- अध्ययनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की विदर्भातील शहरी व ग्रामीण भागातील महाविद्यालयांमध्ये कबड्डी खेळाचा सराव दररोज करण्यात येत असल्याने सार्थक फरक नाही.

**४.३महाविद्यालयात दरवर्षी कबड्डी खेळाचे वार्षिक वेळापत्रक बनविण्यात येते**

- अध्ययनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की विदर्भातील शहरी व ग्रामीण भागातील महाविद्यालयात दरवर्षी कबड्डी खेळाचे वार्षिक वेळापत्रक बनविण्यात येत असण्याध्ये सार्थक फरक नाही.

**४.४महाविद्यालयाचे व्यवस्थापन कबड्डी खेळाच्या नियोजन व आयोजनात सर्व प्रकारची मदत करते**

- अध्ययनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की विदर्भातील शहरी व ग्रामीण भागातील महाविद्यालयाचे व्यवस्थापन कबड्डी खेळाच्या नियोजन व आयोजनात सर्व प्रकारची मदत करीत असण्यामध्ये सार्थक फरक आहे. शहरी भागातील महाविद्यालयापेक्षा ग्रामीण भागातील अधिक महाविद्यालयांचे व्यवस्थापन कबड्डी खेळाच्या नियोजन व आयोजनात सर्व प्रकारची मदत करते.

**४.५कबड्डी खेळाचा स्तर उंचविण्यासाठी महाविद्यालयाद्वारे करण्यात येणारे प्रयत्न**

- अध्ययनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की विदर्भातील शहरी व ग्रामीण भागातील महाविद्यालयाद्वारे कबड्डी खेळाचा स्तर उंचावण्यासाठी करण्यात येणारे प्रयत्नांमध्ये सार्थक फरक नाही. शहरी व ग्रामीण भागातील बहुतांश महाविद्यालयाद्वारे कबड्डी खेळाचा स्तर उंचावण्यासाठी तज्ञ प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यात येते.

**४.६कबड्डी खेळाकरीता प्रशिक्षण शिबीराचे आयोजन होते**

- अध्ययनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की विदर्भाच्या शहरी व ग्रामीण भागातील महाविद्यालयातर्फे कबड्डी खेळाकरीता प्रशिक्षण शिबीराचे आयोजन होत असण्यामध्ये सार्थक फरक

- नाही. त्याचप्रमाणे शहरी व ग्रामीण भागातील बहुतांश कबड्डी खेळाडूंच्या महाविद्यालयातर्फे कबड्डी खेळाकरीता प्रशिक्षण शिबीराचे आयोजन होत नाही.

## ५.०आधारग्रंथ ग्रंथसुची

१. ढोक, भ. म. (२००६). वर्धा जिल्ह्यातील नामवंत कबड्डी खेळाडूंची कामगिरी आणि त्यांचे कबड्डी खेळाच्या विकासात योगदान, लघु शोध प्रबंध नागपुर विद्यापीठाच्या एम.फिल पदवीसाठी सादर, पृ. ७१, ८८, ८९.

२. शिंदे, द., भेंडेगीरी, र व प्रसादराव ई. (१९९७). ‘‘आधुनिक शास्त्रीय कबड्डी प्रशिक्षण’’ पब्लिकेशन ताराराणी स्पोर्टस कल्ब, कोल्हापूर पृ. १ ते ३.

३. भालेराव सु., (२००३). ‘आंतर विद्यापीठ क्रीडास्पर्धात भाग घेणाऱ्या महिला खेळाडूंसमोर उत्पन्न होणाऱ्या समस्यांचा एक विश्लेषणात्मक अभ्यास’, अप्रकाशित शोधप्रबंध, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

४. पाटील, व. (१९९९). ‘‘शिक्षक क्षमता समृद्धी संशोधन’८ महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व प्रशिक्षण परिषद, पुणे, पृ. क्र. ३.

५. पुनैय्या, ल.ई. (२००६).‘‘विदर्भातील विद्यापीठाचे शारीरिक शिक्षण व खेळ सुविधाचे अध्ययन आणि त्याचा खेळ प्रदर्शनावर होणारा परिणाम एक विश्लेषणात्मक अभ्यास’’, पे.नं. १७३—१७४.

६. वाखारकर, दि.गो. (२००६). “शारीरिक शिक्षा का आधुनिक स्वरुप तथा अध्ययन”, पान क्र. ७—१२.

७. बोधनकर सुधीर, प्रा. अलोनी विवेक, सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००३:१४७.

८. कायंदे पाटील डॉ. गंगाधर वि. — संशोधन पद्धती चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक—१३, जून, २००६

९. कऱ्हाडे बी. एम — ‘शास्त्रीय संशोधन पद्धती’ पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर — २००८